महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना [प्रादेशिक नियोजन मंडळ] नियम, १९६७ चे नियम क्र. २[१] व ५[३] मध्ये बदल करण्याबाबत अधिसूचना

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक: टीपीएस१६९८/४३/प्र. क्र. २४/९८/नवि. ९
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १८ ऑगस्ट१९९८.

पहा :- १] दिनांक ४ जुन १९९८ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४ ब मध्ये प्रसिध्द झालेली अधिसूचना क्र. टीपीएस१६९८/४३/प्र.क्र. २४/९८/ नवि. ९ दिनांक : ४ जुन, १९९८

निर्णय :- सोबत जोडलेली अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

[वि. वा. देशपांडे]
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रति,

१] सर्व विभागीय आयुक्त,
२] संचालक, नगरपालिका प्रशासनालय, नवीन प्रशासन इमारती, मुंबई,
३] महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सी-१४, १५, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे [पूर्व]
४] व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल भवन, मुंबई,
५] सर्व जिल्हाधिकारी,
६] संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७] उपसंचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद
८] उपसंचालक नगर रचना प्रादेशिक योजना अहमदनगर/अकोला/सोलापूर
९] विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई ३२
१०] व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई.
[त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्र-भाग-१ कोकण विभाग पुरवणी यामध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ४० प्रती या विभागास पाठविण्यात याव्यात.
११] कक्ष-११, १२, १३ [नगर विकास विभाग,]
१२] निवड नस्ती नवि. ९

नागरे

Technical Circular-च्या फाईलला ठेवा

TOWN PLANNING AND VALUATION

५०७७

३१६१

अ धि सू च ना

नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२,
दिनांक १८ ऑगस्ट, १९९८.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६

क्रमांक-टिपीएस-१६९८/४३/प्र.क्र-२४/९८/नवि-९,

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६[ महाराष्ट्र १९६६ चा ३७ वा] च्या कलम १५८, पोटकलम १ व २ [ एक] ते [नऊ] याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना [ प्रादेशिक नियोजन मंडळ] नियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील प्रमाणे नियम करीत आहे, हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम १५८ च्या पोटकलम [१] द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्द करण्यात आले होते.

नियम

०१. [१] या नियमांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना [ प्रादेशिक नियोजन मंडळ] [ सुधारणा] नियम १९९८ असे म्हणता येईल.

[२] सदर नियम दिनांक १. १. १९९८ पासून अंमलात आले असे समजण्यात येईल.

०२. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना [ प्रादेशिक नियोजन मंडळ] नियम १९६७[ ह्यापुढे " मूळ नियम" असा उल्लेख केलेला आहे] चे नियम क्र. २ उपनियम क्र. [१] मधील पहिल्या परंतुकामध्ये " तीन वर्षे" या शब्दाऐवजी "चार वर्षे " असे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

०३. मूळ नियमाच्या नियम क्र. ५ उपनियम क्र. [३] मधील " सोळा महिने" या शब्दाऐवजी " तिस महिने" असे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

[ के. नलिनाक्षन]
महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव